**महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत वैयक्तीक लाभार्थ्यांच्या शेतावर कृषि विभागामार्फत फळबाग लागवड कार्यक्रम राबविण्याबाबत .....**

**महाराष्ट्र शासन**

नियोजन विभाग

शासन निर्णय क्र. मग्रारो २०११/प्र.क्र. १३२/रोहयो-१०-अ,

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२,

दिनांक : २० जानेवारी, २०१२

**वाचा :** **१.** शासन निर्णय क्र.मग्रारो-२०१०/ प्र.क्र.२/ रोहयो- १० अ, दि. १५ ऑक्टोबर,२०१०

२. शासन निर्णय क्र. मग्रारो-२०११/ प्र.क्र. ५४ / रोहयो- १० अ, दिनांक २७ मे,२०११

३. शासन निर्णय क्र. मग्रारो २०११/ प्र.क्र. ५८/ रोहयो-१०अ, दि. २९.०६.२०११ व दि.२८.०९.२०११

४. शासन परिपत्रक क्रमांक मग्रारो-१०९०/ प्र.क्र. ८४/ रोहयो-१ दिनांक १ नोव्हेंबर, २०११

५. शासन निर्णय क्र. मग्रारो २०११/प्र.क्र. ५८/ रोहयो- १०अ, दि. २९ जून, २०११

**प्रस्तावना :-**

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेची अंमलबजावणी कायद्याच्या राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना कायदा २००५ नुसार राज्यात सुरू आहे. या कायद्याच्या परिशिष्ट - १ च्या कलम १(४) नुसार काही विशिष्ट प्रवर्गातील वैयक्तीक लाभार्थ्यांच्या जमिनीवर सिंचन सुविधा पुरविणे, भुसुधारणेची कामे हाती घेणे, फळबाग लागवड व वृक्ष लागवड इत्यादी वैयक्तीक लाभाची कामे घेण्याची तरतूद आहे. फळबाग लागवड कार्यक्रमांमुळे वैयक्तीक लाभार्थ्यांचे उत्पन्नात वाढ होऊन त्यांचे जीवनमान उंचावण्यास मदत होणार असल्याने अधिनियमानुसार निश्चित केलेल्या वैयक्तीक लाभार्थ्यांच्या जमिनीवर फळबाग लागवड कार्यक्रम ग्रामपंचायतीमार्फत राबविण्याबाबत शासन निर्णय क्र. मग्रारो २०११/ प्र.क्र. ५८/ रोहयो- १० अ, दि. २९ जून, २०११ अन्वये आदेशित करण्यात आले आहे. त्याच धर्तीवर कृषि विभागामार्फत फळबाग लागवड योजना राबविण्याबाबत शासन खालीलप्रमाणे निर्णय घेत आहे.

**शासन निर्णय**

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी अधिनियमाच्या परिशिष्ट - १ कलम १ (४) मधील तरतुदीनुसार कृषि विभागामार्फत फळबाग लागवड कार्यक्रम खालील प्रवर्गातील शेतकऱ्यांच्या जमिनीवर हाती घेण्यास शासन मान्यता देत आहे.

अ) अनुसुचित जाती

ब) अनुसुचित जमाती

क) दारिद्रय रेषेखालील लाभार्थी

ड) भु-सुधार योजनेचे लाभार्थी

इ) इंदिरा आवास योजनेचे लाभार्थी

फ) कृषि कर्ज माफी योजना २००८ नुसार लहान शेतकरी [ १ हेक्टर पेक्षा जास्त पण २ हेक्टर (५ एकर ) पर्यंत जमीन असलेला शेतकरी (जमीन मालक किंवा कुळ)] व सिमांत शेतकरी [ १ हेक्टर पर्यंत जमीन असलेला शेतकरी (जमीन मालक किंवा कुळ)]

**मार्गदर्शक सुचना**

**१. लाभधारक निवड व अर्हता पध्दती :-**

१.१ मगारोहयोसाठी जॉबकार्ड धारक वरील‘ अ ’ ते ‘ फ ’ प्रवर्गातील कोणतीही व्यक्ती वैयक्तीक लाभार्थी म्हणून या योजनेचा लाभ घेण्यास पात्र आहे.

१.२ इच्छुक लाभधारकाच्या नावे जमीन असणे आवश्यक आहे. ही जमीन कुळ कायद्याखाली येत असल्यास व ७/१२ च्या उताऱ्यावर जर कुळाचे नाव असेल तर योजना कुळाच्या संमतीने राबविण्यात यावी. लाभार्थ्याने ७/१२ व ८-अ चे उतारे अर्जासोबत जोडावे.

१.३ इच्छुक लाभार्थ्याने विहीत नमुन्यातील अर्ज ( प्रपत्र - अ प्रमाणे ) ग्रामपंचायतीकडे दाखल करावा.

१.४ मग्रारोहयोच्या कार्यपध्दतीप्रमाणे ग्रामपंचायत व ग्रामसभा यांची मान्यता आवश्यक आहे.

१.५ प्रत्येक वैयक्तिक लाभार्थ्यांसाठी सर्वसाधारणपणे रु.२.०० लाख पर्यंतची मर्यादा असेल. तथापि कोणत्या प्रकारच्या फळझाडांची लागवड करणार व त्यासाठी दर हेक्टरी किती रक्कम अनुज्ञेय आहे. या आधारावर अपवादात्मक परिस्थितीत रू. २.२५ लाख या मर्यादेत असावी. पिकनिहाय खर्चाचे मापदंड सोबतच्या परिशिष्ट १ ते २५ मध्ये दिले आहेत.

१.६ प्रत्येक लाभार्थ्याच्या जमिनीवरील फळझाड लागवड हा स्वतंत्र प्रकल्प समजण्यात येईल. अशा प्रत्येक प्रकल्पासाठी प्रशासकीय व तांत्रिक मान्यता स्वतंत्रपणे देण्यात येईल. तसेच या प्रत्येक प्रकल्पाला MIS वर नोंद घेण्यासाठी स्वतंत्र संगणक क्रमांक असेल.

१.७ कृषि विभागाचे तांत्रिक अधिकारी तांत्रिक मान्यता देतील.

१.८ सदर योजना कृषिविभागामार्फत राबविण्यात येणार असल्याने प्रशासकीय मान्यता तहसिलदार यांनी द्यावी.

**२. लाभार्थ्याची जबाबदारी**

२.१ महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी अधिनियमाच्या परिशिष्ट - १ कलम १ (४) च्या अधिन राहून फळबाग लागवड करणारे लाभार्थी जॉबकार्ड धारक असल्याने त्यांनी स्वत:च्या क्षेत्रात केलेल्या फळबाग लागवडीचे संवर्धन व जोपासना करण्याची जबाबदारी लाभार्थ्याची राहील.

२.२ पिकनिहाय मापदंडानुसार दुसऱ्या व तिसऱ्या वर्षातील जिवंत झाडांच्या टक्केवारीप्रमाणे कामे करण्याची जबाबदारी लाभार्थ्यांची राहील.

२.३ दुस-या व तीस-या वर्षी बागायत वृक्ष पिकांचे बाबतीत जे लाभार्थी कमीत कमी ९० टक्के आणि कोरडवाहू वृक्ष पिकांच्या बाबतीत ७५ टक्के झाडे जीवंत ठेवतील फक्त अशाच लाभार्थ्यांना दुस-या व तीस-या वर्षाचे अनुदान देय राहील.

**३. सल्लागार समिती व प्रकल्पावर निरिक्षण**

३.१ प्रकल्पावर निरिक्षण ठेवणे आवश्यक आहे. जिल्हाधिकाऱ्यांनी कृषि अधिकाऱ्यास या कामी मदत करण्यासाठी आवश्यक वाटल्यास कंत्राटी पध्दतीने तालुका पातळीवर तांत्रिक अधिकाऱ्याची नियुक्ती करावी. तसेच तालुका कृषि अधिकाऱ्याने ग्राम पातळीवरील कृषि सहायकांना प्रकल्पाला सर्व प्रकारचे तांत्रिक मार्गदर्शन करण्याच्या सूचना द्याव्यात.

३.२ राज्य रोहयोच्या फळबाग लागवड कार्यक्रमाच्या कार्यपध्दतीनुसार व ठरलेल्या दराप्रमाणेच या योजनेसाठी कलमे/रोपे कृषि विभागाने पुरवावीत. जेणेकरुन साहित्याचा दर्जा कायम राहील. कृषि विभागाने या रक्कमेची व्हाऊचर सादर केल्यानंतर तहसिलदार रक्कम थेट कृषि विभागास प्रदान करावी व सदर रक्कम प्रकल्पाच्या खर्चात समाविष्ट करावी.

**४. कृषि विभागाची जबाबदारी दि.२७/५/२०११ अन्वये कार्यवाही करावी.**

योजना राबवितांना महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या कार्यपध्दतीचे काटेकोरपणे पालन करणे आवश्यक आहे. विशेषतः रोहयो विभागामार्फत निर्गमित करण्यात आलेले शासन निर्णय क्र.मग्रारो-२०१०/ प्र.क्र.२/ रोहयो- १० अ, दि. १५ ऑक्टोबर,२०१० अन्वये कुशल कामावरील (साधन सामुग्रीवरील) खर्चाबाबत मार्गदर्शक सूचना, शासन निर्णय क्र. मग्रारो-२०११/ प्र.क्र. ५४ / रोहयो- १० अ, दिनांक २७ मे,२०११ व दिनांक २८ सप्टें. २०११ अन्वये मग्रारोहयो अंतर्गत इतर यंत्रणांची महत्वाची भूमिका व जबाबदारी याबाबत दिलेल्या सूचना तसेच शासन परिपत्रक क्रमांक मग्रारो-१०९०/ प्र.क्र. ८४/ रोहयो-१ दिनांक १ नोव्हेंबर, २०११ अन्वये देण्यात आलेल्या मागदर्शक सूचनांचे पालन करणे अत्यावश्यक राहील.

**५. मग्रारोहयोच्या (MGNREGA) सर्व मार्गदर्शक सुचनांचे पालन करणे.**

१) लाथार्थी स्वतः जॉब कार्ड धारक असावा,

२) लाभार्थी वरील परि.१ मधील ‘ अ ’ ते ‘ फ ’ या प्रवर्गातील असावा.

३) जॉब कार्ड धारकाच्या खात्यावर (Record) कामाची नोंद करावी.

४) दर १५ दिवसांनी मस्टर प्रमाणे मजूरी प्रदान करावी.

५) संपूर्ण फळबाग लागवड कार्यक्रमासाठी पूर्व हंगामी मशागत कामे, खड्डे खोदणे, झाडांची लागवड करणे, पाणी देणे, किटकनाशके /औषधे फवारणी व झाडांचे संरक्षण करणे ही कामे लाभधारकाने स्वतः व जॉबकार्ड धारक मजूराकडून करून घेण्याची जबाबदारी लाभार्थ्यांची राहील.

६) इतर जॉबकार्ड धारकही काम करु शकतात व त्यांना नरेगाची मजूरी मिळू शकते.

७) मजूरीची रक्कम फक्त पोस्ट / बँकेमार्फतच दिली जाईल.

८) ग्रामपंचायतीची शिफारस व मान्यता असणे आवश्यक आहे.

९) आवश्यक प्रमाणपत्रे जसे जातीचा दाखला, दारिद्रय रेषेखालील दाखला इ. तहसिलदारांकडून प्राप्त करुन घेणे व प्रकरणाला जोडणे आवश्यक आहे.

१०) ग्राम रोजगार नोंदवहीत व ग्राम मालमत्ता नोंदवहीत सर्व प्रकारच्या नोंदी घेणे आवश्यक आहे.

११) कामात पारदर्शकता असण्यासाठी मग्रारोहयोच्या नियमाप्रमाणे सामाजीक अंकेक्षण व्हावे.

११) MIS वरील सर्व प्रकारच्या नोंदी घेणे,

१२) प्रकल्पस्थळावर फलक लावणे.

**६. राज्य रोहयो व मग्रारोहयो मधील फरक.**

राज्य रोहयो अंतर्गत वैयक्तीक लाभाच्या योजना व महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत वैयक्तीक लाभाच्या योजनांमधील फरक पुढीलप्रमाणे आहे.

| राज्य रोहयो | महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना |
|---|---|
| १) राज्य रोहयो कायद्याच्या कलम 7 (2) (X) प्रमाणे | १) केंद्रीय कायद्याच्या परिशिष्ट - १ मधील कलम 1(IV) प्रमाणे |
| २) योजना<br>अ) जवाहर विहिरी<br>ब) शेततळे<br>क) रोहयो फळबाग लागवड<br>ड) खाजगी पडीक जमिनीवर वृक्ष लागवड<br>इ) रोहयो तुती लागवड | २) योजना<br>अ) मग्रारोहयो विहिरी<br>ब) शेततळे (यंत्रसामुग्रीचा वापर न करता )<br>क) मग्रारोहयो फळबाग लागवड<br>ड) भु-सुधारणा |
| ३) अनुदान पध्दतीची प्रतिपूर्ती योजना | ३) प्रत्यक्ष कामावर येणारा खर्च शासनाकडून करण्यात येतो. |
| ४) जॉबकार्डची आवश्यकता नाही. | ४) जॉबकार्ड आवश्यक आहे. |
| ५) विविध स्तरावर मान्यता | ५) ग्रामसभेद्वारे लाभार्थ्यांची निवड करण्यात येते व गटविकास अधिकारी प्रशासकीय मान्यता देतात. |
| ६) विविध यंत्रणांकडून अंमलबजावणी | ६) सर्वसाधारणपणे ग्रामपंचायतीकडून अंमलबजावणी |
| ७) प्रतिपूर्ती योजना असल्याने यंत्रसामुग्री वापरण्यास मुभा आहे. | ७) मग्रारोहयो अंतर्गत यंत्रसामुग्री वापरण्यास मुभा नाही. |
| ८) १५ दिवसात अनुदान देणे बंधनकारक नाही. | ८) १५ दिवसात मजूरी प्रदान करणे बंधनकारक आहे. |
| ९) राज्य शासनाच्या निकषांप्रमाणे लाभार्थ्यांची निवड करण्यात येते. | ९) महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायद्यातील तरतुदीनुसार वरील 'अ' ते 'फ' प्रवर्गातील लाभार्थ्यांची निवड करण्यात येते. |
| १०) राज्य शासनाने ठरवून दिलेल्या मार्गदर्शक सूचनांचे पालन करणे बंधनकारक | १०) महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या मार्गदर्शक सूचनांचे पालन करणे बंधनकारक |

**७. मजूरी प्रदान व साधन सामुग्रीच्या खर्चाचे प्रदान करण्याचे प्रकार व कार्यपध्दती.**

७.१ हजेरीपत्रकाच्या आधारावर तहसिलदारामार्फत मजूरी प्रदान करण्यात येईल. सदर मजूरी दर १५ दिवसांनी बँक व पोस्ट ऑफिसच्या माध्यमातून मजूरांनाअदा करण्यात येईल.

७.२ साधनसामुग्रीवरील खर्चाची प्रदान खालील प्रमाणे करण्यात येईल.

अ) फळझाडे लागवडीसाठी लागणारी कलमे/रोपे यांचा खर्च बील / व्हाऊचर कृषि विभागाने सादर केल्यानंतर तहसिलदार त्यांना प्रदान करतील.

ब) निविष्ठा (खते, औषधे व इतर साहित्य) या वरील खर्चाची रक्कम थेट लाभार्थ्यास प्रमाणपत्र /व्हाऊचर सादर केल्यानंतर देण्यात येईल.

**८. <u>अन्य विभागांशी सांगड</u>**

या योजनेच्या लाभार्थ्यांना अन्य विभागांच्या योजनांशी सांगड घालून त्या योजनांचा लाभ घेता येईल. फळबाग लागवड केल्यानंतर अन्य योजना जसे ठिबक सिंचन किंवा विहिरी यांचा लाभ घेता येईल (मग्रारोहयोच्या विहिरींचाही लाभ घेता येईल )

**९. <u>कार्यक्रम वेळापत्रक</u>**

या योजनेसाठी विशेष कार्यक्रमाचे वेळापत्रक कृषि व फलोत्पादन विभागाने ठेवावे <u>(प्रपत्र - ब)</u>

**१०. <u>निरीक्षण नोंदवही</u>**

अ) केलेल्या फळबाग लागवडीचे निरीक्षण करण्यासाठी मापनपुस्तिका कृषि विभागाने ठेवावी व त्याबाबतची माहिती ग्रामपंचायतीस सादर करावी. <u>( प्रपत्र - क)</u>

ब) गाव पातळीवर सर्व माहितीची नोंद करणे तसेच नरेगाच्या मालमत्ता रजिस्टर मध्ये ग्रामपंचातीने नोंद घेणे. <u>( प्रपत्र - ड )</u>

**११. <u>फलोत्पादन लागवडीची आकडेवारी</u>**

राज्य रोहयो व मग्रारोहयो या दोन्ही योजनांतर्गत फलोत्पादन लागवडीची स्वतंत्र आकडेवारी तालुका कृषि अधिकारी यांनी ठेवावी. जेणेकरुन तालुक्यात फलोत्पादन लागवडीबाबत साध्य केलेल्या उद्दीष्टांची माहिती मिळेल.

सदर योजना प्रभावीपणे राबविण्यासाठी तहसिलदार व तालुका कृषि अधिकारी यांच्यात परस्पर समन्वय व सहकार्य असावे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक क्र. २०१२०१२१०४४७०६१६००१
असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**(व्ही.गिरीराज)**

**प्रधान सचिव**

प्रति,

१) मा. राज्यपालांचे सचिव,
२) मा.मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव,मंत्रालय,मुंबई-४०००३२
३) मा. उपमुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
४) मा.मंत्री/राज्यमंत्री (रोहयो) यांचे खाजगी सचिव,मंत्रालय,मुंबई-४०००३२
५) मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांचे स्वीय सहायक,
६) प्रधान सचिव (रोहयो), नियोजन विभाग,मंत्रालय,मुंबई-४०००३२
७) प्रधान सचिव, (कृषी) कृषी व पदुम विभाग, मंत्रालय,मुंबई-४०००३२
८) सर्व विभागीय आयुक्त,
९) आयुक्त, कृषी, महाराष्ट्र राज्य, पुणे.
१०) सर्व जिल्हाधिकारी, (मुंबई व मुंबई उपनगर वगळून)
११) संचालक, फलोत्पादन, महाराष्ट्र राज्य, पुणे.

१२) मुख्य अभियंता व सह सचिव (रोहयो)
१३) सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद.
१४) सर्व विशेष कार्यकारी अधिकारी व उप विकास आयुक्त (रोहयो)
१५) सर्व उप जिल्हाधिकारी (रोहयो)
१६) मुख्य अभियंता,लघुपाटबंधारे विभाग (स्थानिक स्तर), पुणे.
१७) सर्व विभागीय कृषी सहसंचालक,
१८) समिती अधिकारी, कार्यासन ड-७, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधान भवन,
१९) सर्व उपसचिव/ अवर सचिव/कक्ष अधिकारी, (मग्रारोहयो) नियोजन विभाग, मंत्रालय,
२०) कक्ष अधिकारी, रोहयो-१, सारसंग्रह
२१) निवड नस्ती,कार्यासन रोहयो-१० अ, नियोजन विभाग,मंत्रालय, मुंबई-३२.

## प्रपत्र - अ

**महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत वैयक्तिक लाभार्थ्यांच्या जमिनीवर फळबाग कार्यक्रम घेण्याबाबत व कामाच्या मागणीसाठी अर्ज.**

प्रति,
सचिव, ग्रामपंचायत
तथा ग्राम सेवक
ग्रामपंचायत....................
तालुका ........... जिल्हा.................

प्रति,
गट विकास धिकारी
पंचायत समिती...................
जिल्हा..............................

दिनांक

अर्ज क्रमांक

विषय :- कामाच्या मागणीसाठी तसेच माझ्या मालकीच्या जमिनीवर मग्रारोहयोचा फळबाग कार्यक्रम घेण्याबाबत अर्ज

महोदय,

मग्रारोह अधिनियम २००५ च्या कलम ३ (१) व परिशिष्ट - दोन च्या परिच्छेद - ९ नुसार कामाच्या मागणीसाठी मी अर्ज करीत आहे. माझ्या कामाच्या मागणीबाबत व कालावधीबाबत तपशिल पुढीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | मागणी करणा-याचे संपूर्ण नाव | पत्ता | जॉब कार्ड क्रमांक | कामाच्या मागणीचा कालावधी | | आवश्यक साहित्य |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | पासून | पर्यंत | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| | | | | | | |

या कामावर मी किमान १४ दिवस काम करु इच्छितो.

अर्जदाराची सही / डाव्या हाताच्या अंगठयाचा ठसा

तसेच मी, अनुसूचित जाती / अनुसूचित जमाती / दारिद्रय रेषेखालील व्यक्ती / इंदिरा आवास योजनेचे लाभार्थी / भूसधार योजनेचे लाभार्थी / अल्प भूधारक आणि सिमांत शेतकरी या प्रवर्गातील लाभार्थी असून, माझ्या जमिनीवर फळबाग लागवड कार्यक्रम घेऊ इच्छितो. माझ्या मालकीच्या जमिनीची सर्व संबंधीत कागदपत्रे मी सोबत जोडली आहेत. याबाबतचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

१) धारण केलेली एकूण जमिन ( सर्वे नं. गट नं. ) क्षेत्र -------------- हेक्टर
२) ज्या जमिनीवर फळबाग लागवड कार्यक्रम घ्यावयाचा आहे. त्याचे क्षेत्र ------------- हेक्टर
३) लागवड करण्याचे ठरविलेल्या फळपिकाचा तपशील झाडांच्या संख्येसह
४) फळपिकांच्या सिंचनासाठी उपलब्ध स्त्रोत

माझ्या शेतात महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत लागवड केलेल्या फळपिकाचे संगोपन व संवर्धन करण्याची जबाबदारी माझी राहील.

अर्जदाराची सही / डाव्या हाताच्या अंगठयाचा ठसा

**प्रपत्र - ब**

**फळबाग लागवड कार्यक्रमाचे वेळापत्रक**

| अ.क्र. | बाबवार कामे | काम पूर्ण करण्याचा महिना | शेरा |
|---|---|---|---|
| १ | तांत्रिक अधिका-यामार्फत स्थळ पहाणी | | |
| २ | जिल्हा वार्षिक नियोजन आराखडयामध्ये कामाचा अंतर्भाव करणे | | |
| ३ | तांत्रिक अधिका-याने सर्वेक्षण करुन खर्चाचे अंदाजपत्रक व आराखडा तांत्रिक मंजूरीसह सादर करणे. | . | |
| ४ | वार्षिक कृती आराखडयाप्रमाणे तहसिलदाराने कामास प्रशासकीय मंजूरी देणे. | | |
| ५ | फळबाग लागवडीसाठी लागणा-या कलमे / रोपे यांचे मागणीपत्र जिल्हा कृषि अधिकारी यांचे कडे नोंदविणे | | |
| ६ | काम सुरु करण्याबाबतचे आदेश व हजेरीपत्रक निर्गमीत करणे. | | |
| ७ | माती परिक्षणासाठी नमूने घेणे. | | |
| ८ | खड्डे खोदणे व तदअनुषंगिक कामे ( सेंद्रिय खताची उपलब्धता करणे इ. ) | | पहिला टप्प पूर्ण |
| ९ | निविष्ठा ( खते / शेणखत / सेंदिय खत / रासायनिक खते ) व औषधे ( फॉलिडॉल डस्ट ) | | |
| १० | माती खताच्या व फोलिडॉल डस्टच्या मिश्रणाने खड्डे भरणे. | | |
| ११ | कलमे रोपे रोपवाटीका ते शेतापर्यंत वाहतूक | | |
| १२ | रोपे / कलमे यांची लागवड करणे | | दुसरा टप्पा पूर्ण |
| १३ | आंतरमशागतीची कामे<br>१ तण काढणे व कोळपणी करणे<br>२ पाणी देणे<br>३ गरजेप्रमाणे रासायनिक खते व औषधांचा वापर करणे. | | तिसरा टप्पा पूर्ण |

# प्रपत्र - क

## फळबाग लागवडीचे संनियंत्रण नोंदवही

लाभार्थ्यांचे नाव सर्व्हे नं. ग्राम पंचायत गट फळपिकाचे नाव

| अ.क्र. | बाबी | महिना | | | | | | | | | | | | तांत्रीक अधिकाऱ्याची सही |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | | | | | | १५ |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ | |
| | | एप्रिल | मे | जून | जूलै | ऑगस्ट | सप्टेंबर | ऑक्टोबर | नोव्हेंबर | डिसेंबर | जानेवारी | फेब्रुवारी | मार्च | |
| १ | कामाची आखणे करणे. | | | | | | | | | | | | | |
| २ | मातीचे नमुने तपासणीसाठी घेणे. | | | | | | | | | | | | | |
| ३ | खड्डे खोदणे व तत्सम मातीकाम | | | | | | | | | | | | | |
| ४ | कुंपण घालणे | | | | | | | | | | | | | |
| ५ | माती व खताच्या मिश्रणाने खड्डे भरणे | | | | | | | | | | | | | |
| ६ | रोपे / कलमे यांची लागवड करणे. | | | | | | | | | | | | | |
| ७ | रासायनीक खते देणे. | | | | | | | | | | | | | |
| ८ | सेंद्रिय खते देणे. | | | | | | | | | | | | | |

# प्रपत्र - ड

## वैयक्तिक लाभार्थीच्या जमिनीवर मग्रारोहयो अंतर्गत केलेल्या कामाची मालमत्ता नोंदवही

गाव ग्रामपंचायत गट / तालुका जिल्हा

| अ.क्र. | लाभार्थ्यांचे संपूर्ण नाव | लाभार्थी प्रवर्ग अ.जा / अ.ज/दारिद्रय रेषेखालील लाभार्थी / इं. आ. योजनेचे लाभार्थी / भुसुधार योजनेचे लाभार्थी / अल्प व अत्यल्प भूधारक | धारण केलेले एकूण क्षेत्र व सर्व्हे नं. | ज्या जमिनीवर लागवड केली त्या जमिनीचे क्षेत्र व सर्व्हे नं. | फळपिकाचे नाव व वाण | लागवड केलेल्या फळझाडांची संख्या | खर्च |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| | | | | | | | |